आवक क्र. ८०
२७/९/९३

जा. क्रं. माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे विभाग/१९९३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे- ४११ ००१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 24 SEP 1993

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद
पुणे

विषय :- प्रथम मान्यता
न्यू इंग्लिश स्कूल अण्णापूर

संदर्भ :- आपले पत्र जा. शिक्षण/माध्य/ई-४/९२-९३ दिनांक २९-७-९३

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये मराठी रयत शिक्षण संस्था संस्थेच्या माध्यमिक शाळेच्यां इ. ८वी/९वी/१० वी च्या वर्गास सन १९ ९१ - १९ ९२ या शैक्षणिक वर्षासाठी /सन १९ ९२ पासून प्रथम मान्यता/मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्य] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतचा अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे यांचेकडून मंजूर घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्यायावत नोंदी घेण्यात याव्यात
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३] विद्यार्थी संख्येत वाढ करावी.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत:- मुख्याध्यापक
न्यू इंग्लिश स्कूल अण्णापूर
ता. शिरुर जि. पुणे